# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१५३** **दिनांक - २०/०४/२०२४**

**“ दोन समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी पत्रकारांचे व्हाटसअपग्रुपवर आक्षेपार्ह मेसेज पोस्ट करणारा तोतया पत्रकारास अटक ”**

दिनांक १४.०४.२०२४ रोजी “महाराष्ट्र न्युज नेटवर्क ”या पत्रकारांचे व्हाटसअप या प्रसारमाध्यमांवर ४ पत्रकारांचे फोटो लावुन त्याखाली धार्मिक तेढ निर्माण करणारा संदेश प्रसारित केल्याचे सबंधित पत्रकारांचे निदर्शनास आल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारी वरुन नयानगर पोलीस ठाणे गुरनं ा २०२/२०२४ भादंविस कलम ४१९,४७६,५००,५०१,५०६ प्रमाणे गुन्हा दिनांक १४.०४.२०२४ रोजी दाखल आहे.

नजिकच्या काळात नयानगर परिसरात उदभवलेल्या जातीय तेढच्या पार्श्वभुमीवर सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन तातडीने गुन्हयाचा तपास करुन “महाराष्ट्र न्युज नेटवर्क ” या व्हाटसअपग्रुपवर आक्षेपार्ह मेसेज पोस्ट केलेला आरोपीतास निष्पन्न करुन त्यास दिनांक १५.०४.२०२४ रोजी अटक करण्यात आली . अधिक तपास करण्यात येत आहे.

नागरीकांना याव्दारे अशा प्रकारचे धार्मिक/जातीय तेढ निर्माण करणारे तसेच सामाजिक असंतोष निर्माण करणारे आक्षेपार्ह संदेश कोणत्याही सोशल मिडीयावर पोस्ट न करणेबाबत तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवणेबाबत तसेच अशा प्रकारच्या घटना निदर्शनास येताच त्याबाबत तात्काळ पोलीस विभागाला माहीती देवुन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

श्री प्रकाश गायकवाड, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ – ०१, श्री राजेंद्र मोकाशी, मा.सहा पोलीस आयुक्त,नवघर विभाग, श्री विलास सुपे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक नयानगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि पराग भाट,पोउनि प्रविण जगताप,पोहवा/०६०७८ विजय गुरव सर्व नेमणुक नयानगर पोलीस ठाणे यांनी सदरची कार्यवाही केली आहे.